# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र
वर्ष क्र. २२ – अंक क्र. १

## नवे वर्ष सर्वांना सुखासमाधानाचे व भरभराटीचे लाभो!

## We wish you all a happy and prosperous New Year!

नमस्कार मंडळी!

सौ. अनघा मनाहेर यांच्या अध्यक्षतेखालील गेल्या वर्षीच्या कार्यकारिणी समितीचे नवीन कार्यकारिणी समितीच्या वतीने मनःपूर्वक आभार! गेल्या वर्षीच्या समितीने सर्व कार्यक्रम अतिशय यशस्वीरित्या संपन्न केले. सर्व कार्यक्रमांना उत्तम प्रतिसाद देऊन ते कार्यक्रम यशस्वी करण्यात आपण सर्वांनी हातभार लावला. नवीन कार्यकारिणी समितीही या वर्षी मनोरंजनाचे कार्यक्रम असेच यशस्वीरित्या आयोजित करण्याचा पुरेपूर प्रयत्न करेल. सर्व कार्यक्रमांना आपणा सर्वांची उपस्थिती अपेक्षित आहे.

नव्या कार्यकारिणी समितीने दि. १ डिसेंबर रोजी बैठक भरवून २००८ सालातील कार्यक्रमांची रूपरेषा आखली. तसेच काही महत्त्वाचे निर्णयही घेतले. या निर्णयांचा आढावा खालीलप्रमाणे –

(१) मंडळाचे सभासद होण्यासाठी आतापर्यंत वर्षे 'नीलपत्र' आणि 'पीतपत्र' असे दोन पर्याय उपलब्ध होते. पण गेल्या पाचसहा वर्षांमधे फक्त चारपाचच सभासदांनी पीतपत्र पर्यायाचा उपयोग केल्याचे दिसून आले. म्हणून २००८ सालापासून पीतपत्र पर्याय रद्द केला जात आहे.

(२) मंडळाच्या कार्यक्रमांच्या वेळी एखाद्या मनोरंजनाच्या कार्यक्रमात ज्या सभासदांना (किंवा त्यांच्या मुलांना) भाग घेण्याची किंवा स्वतःचा कार्यक्रम सादर करण्याची इच्छा असेल, त्यांनी नीलपत्रधारक असणे आवश्यक आहे.

(३) सध्या ४६ सभासद नीलपत्रधारक आहेत (पान ६वर त्यांची यादी पहावी). नवीन कार्यकारिणी समिती नीलपत्रधारकांची संख्या वाढविण्याचा कसोशीने प्रयत्न करणार आहे. २००८ सालातील मंडळाच्या कार्यक्रमांसाठी नीलपत्रधारकांना प्रवेश विनामूल्य असेल.

(1) Until now there were two alternatives available for membership – Blue Card Membership and the Yellow Card Membership. However, during the past 5 or 6 years, only four or five members became Yellow Card Members. So, Yellow Card Membership is cancelled beginning 2008.

(2) If any member(s) (or their children) wish to participate in or present entertainment items at the time of a Mandal program, such members need to hold the Blue Card Membership.

(3) So far 46 members have taken the Blue Card Membership for the Calendar Year 2008 (Please see the list on Page 6). The new executive committee will try hard to increase the number of Blue Card Members. Blue Card Members will not be charged entry fee for any Mandal program in 2008.

कार्यकारिणी समिती
(२००७ – २००८)

अध्यक्ष
श्री. अजय बेळंबे
(७२४–९३४–५५२७)

उपाध्यक्ष
श्री. नितिन हत्तंगडी
(७२४–३२७–२१८९)

सचिव
डॉ. सौ. शोभा जतकर
(४१२–३७२–५२८३)

कोषाध्यक्ष
श्री. विष्णु धर्माधिकारी
(४१२–३६६–१९७९)

वार्तापत्र संपादक
डॉ. अरुण जतकर
(४१२–३७२–५२८३)

कार्यकारी सभासद
श्री. महेश साने
(४१२–३६७–७७५१)
सौ. अर्चना चौक
(४१२–२५९–८७४०)
सौ. सुचिता लंबोर
(४१२–४८६–३८३०)
सौ. स्वरूप नेमळेकर
(७२४–५३८–३८९४)
सौ. सोनाली पाटील
(४१२–३६७–१७७८)
श्री. बिपिन साळुंखे
(७२४–४७३–१०९०)
सौ. शकुंतला शिंदे
(७२४–९३३–१९४३)
श्री. संदीप सबनीस
(४१२–९७३–९५१७)
श्री. सागर जोशी
(४१२–७२८–५३८१)

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २२ — अंक क्र. १


## २००७ सालातील दिवाळीच्या कार्यक्रमाचा आढावा

दि. १० नोव्हेंबर, २००७ रोजी मंडळाने दिवाळी साजरी केली. त्या समारंभाला २००हून अधिक मंडळी उपस्थित होती. फराळाचे पदार्थ व्यवस्थितपणे मांडून ठेवायची जबाबदारी सौ. मनाली साने व सौ. अनघा मनोहर यांनी सांभाळली.

चहा-कॉफी, फराळ आणि एकमेकांची विचारपूस व अभीष्टचिंतन यांसाठी राखून ठेवलेला अवधी संपल्यावर लक्ष्मीपूजन करण्यात आले. त्यानंतर कु. रमा गोडसे हिने तीन आरत्या गाऊन दिवाळीच्या समारंभाची सुरुवात केली. लहान मुलांचे एकट्याएकट्यांचे (solo) व सामूहिक (group) नाच या कार्यक्रमांचे संचालन सौ. अनघा मनोहर यांनी केले होते.

दोनतीन वर्षांच्या मुलांपासून प्रौढांपर्यंतच्या सभासदांनी मनोरंजनाच्या एकूण २१ चिजा (items) सादर केल्या. भारतातून अल्पकाळासाठी आलेल्या सौ. क्षीरसागर यांनी दोन गाणी गायली. मनोरंजनाच्या कार्यक्रमातील काही छायाचित्रे मंडळाच्या वेबसाईटवर (mmpgh.org) पाहता येईल.

दिवाळीच्या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दांडिया नाचांना ध्वनिमुद्रित संगीताऐवजी सभासद—कलाकारांनी स्वतःच्या गायनाची (सौ. विनीता बेळंबे, सौ. शकुंतला शिंदे, डॉ. सौ. मिता लोवलेकर, श्री. नितिन हत्तंगडी आणि डॉ. प्रदीप फुले) आणि वाद्यसंगीताची (श्री. प्रदीप नेमळेकर, श्री. गिरीश गोडबोले, डॉ. प्रदीप फुले, श्री. धर्माधिकारी आणि कु. वरुण बदामी) साथ दिली. या सर्व कलाकार—सभासदांचे मनःपूर्वक आभार व अभिनंदन. दांडियाच्या मध्यंतरात रॅफल्सचा उपक्रम झाला. रॅफल्ससाठी लहानमोठी मिळून एकूण २० बक्षिसे ठेवली होती. रॅफल्सच्या तिकिटविक्रीतून ३३० डॉ. जमा झाले. रॅफल्सच्या बक्षिसांच्या रूपाने मदत केल्याबद्दल खालील मंडळींचे मनःपूर्वक आभार —

● श्री. व सौ. बेळंबे ● डॉ. सौ. नीला चौधरी ● श्री. व सौ. धर्माधिकारी ● डॉ. व डॉ. सौ. फुले ● प्रीति गुप्ते
● श्री. व सौ. हेगडे ● डॉ. व डॉ. सौ. जतकर ● जुई जोशी ● डॉ. व सौ. मनाहेर ● डॉ. व सौ. मुजुमदार
● सौ. सायली मूर्ति ● डॉ. व सौ. पंडित ● श्री. व सौ. साने ● श्री. व सौ. ठकार

फराळाची तजवीज, लहानांचे व थोरांचे करमणुकीचे कार्यक्रम, जेवण वाढून देणे, लहान मुलांकडे लक्ष ठेवणे, हॉलच्या स्वच्छतेची काळजी वाहणे, अशा नानाविध प्रकारांनी दिवाळीचा कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाचा हातभार लावणाऱ्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद!

मंडळाच्या आमसभेत (General Body Meeting) नव्या (२००७-२००८) कार्यकारिणी समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाधिकारी, सचिव आणि कार्यकारी सदस्य यांच्या नेमणुका जाहीर करण्यात आल्या.

## ● २००८ सालातील कार्यक्रमांची रूपरेषा —

### १. मकर संक्रांत (Makar Sankrant)

तारीख आणि वेळ — शनिवार, २६ जानेवारी २००८ रोजी, संध्याकाळी ५ ते १० वा.

स्थळ — मरीसव्हिल् कम्युनिटी सेंटर (रूट २२ पासून जरासे आत)

मिसळ, बटाटे वडे व शीत पेये (soft drinks) असा खाण्यापिण्याचा बेत असेल. मनोरंजनासाठी बैठे खेळ आणि इतर उपक्रम आयोजित केले जातील. ह्यासंबंधी कोणास काही कल्पना सुचवायच्या असल्यास कार्यक्रमाच्या आयोजिका सौ. सोनाली पाटील (412-367-1778) किंवा सौ. अर्चना चौक (412-259-8740) यांना कृपया १५ जानेवारीपर्यंत कळवाव्यात. मरीसव्हिल् कम्यूनिटी सेंटरपर्यंतच्या मार्गदर्शनपर सूचना (Directions) पान ५ वर दिल्या आहेत.

Mandal will celebrate MAKAR SANKRANTI on Saturday, 26 January 2008 at the Murrysville Community Center (off Rte 22) from 5 PM to 10 PM. Hearty refreshments will consist of 'Misal", "Batata Vade" and soft drinks. Entertainment will consist of parlor games and other items. If anyone wishes to suggest special ideas for the program, please contact the program organizers Mrs. Sonali Patil (412-367-1778) or Mrs. Archana Chauk (412-259-8740) by 15 January 2008. Driving directions to Murrysville Community Center are provided on Page 5.

## २. नाटक –

मंडळातील हौशी कलाकार दोन लहान नाटिका बसवून त्या सादर करीत आहेत. नाटकांचे आयोजन व दिग्दर्शन डॉ. उदयन आपटे करीत आहेत. स्थानिक कलाकारांनी बसविलेली एक नृत्य–संगीतिकाही सादर केली जाईल. अधिक माहिती पुढील वार्तापत्रात.

तारीख, वेळ – शनिवार, दि. २२ मार्च, २००८

स्थळ – श्री. वेंकटेश्वर मंदिराचे सभागृह

Artist members of the Mandal will present two short plays in Marathi on Saturday, 22 March 2008. These are directed by Dr. Udayan Apte. In addition, a short musical (dances choreographed to music) will also be presented by our local artists. Venue – S. V. Temple Auditorium. More details will be available in the next newsletter.

## ३. पिकनिक

तारीख, वेळ – शनिवार, दि. १४ जून, २००८; सकाळी ११ पासून

स्थळ – **एल्म ग्रोव्ह, पीटर्स टाउनशिप, साउथ हिल्स**

दि. १४ जूनचा कार्यक्रम पावसामुळे रद्द करावा लागल्यास पुढील तारीख (rain date) २१ जून.

Mandal has scheduled Picnic from 11 AM onwards on 14 June 2008 at the Elm Grove in Peters Township, South Hills. The rain date is 21 June 2008.

## ४ गणेश चतुर्थी

तारीख, वेळ – रविवार, दि. ७ सप्टेंबर, २००८; सकाळी १०:३० पासून

स्थळ – **हिंदु-जैन मंदिर**

Mandal will celebrate Ganesha Chaturthi on Sunday, 07 September 2008. The celebration will begin at 10:30 AM in the Hindu-Jain Temple in Pittsburgh, PA.

## ५ कोजागिरी

तारीख, वेळ – शनिवार, ११ ऑक्टोबर, २००८

स्थळ – या कार्यक्रमाचे इतर तपशील पुढील वार्तापत्रातून कळविण्यात येतील.

Mandal will celebrate KOJAGIRI night on Saturday, 11 October 2008. Further details will be published in the future newsletters.

## ६ दिवाळी

तारीख, वेळ – शनिवार, १ नोव्हेंबर, २००८; दुपारी ४ पासून

स्थळ – या कार्यक्रमाचे इतर तपशील पुढील वार्तापत्रातून कळविण्यात येतील.

Mandal will celebrate DIWALI on Saturday, 01 November 2008. Further details will be published in the future newsletters.

***************************************************************************************************

## अभिनंदन

मंडळाचे दीर्घकालीन सदस्य (व माजी अध्यक्ष) डॉ. विजय वर्टी व सौ. आरती वर्टी यांचे चिरंजीव व स्नुषा श्री. सचिन व सौ. मेगन वर्टी यांना २००७ सालाच्या ऑक्टोबर महिन्यात मुलगा झाला. मुलाचे नांव 'रोनन' ठेवले आहे. सर्व वर्टी मंडळींचे हार्दिक अभिनंदन!

// महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग
वार्तापत्र
वर्ष क्र. २२ — अंक क्र. १

## दुःखद निधन

मंडळाचे दीर्घकालीन सदस्य आणि पिट्स्बर्गचे सुमारे ४० वर्षांचे रहिवासी डॉ. मनोहर ऊर्फ बाळासाहेब जोशी यांना दि. २४ ऑक्टोबर २००७ देवाज्ञा झाली. डॉ. मनोहर जोशी व त्यांच्या पत्नी श्रीमती शुभा जोशी यांनी १९७४ साली पिट्स्बर्गमधील सर्व मराठी मंडळींची एकत्र दिवाळी आपल्या घरी साजरी करण्याच रिवाज सुरू केला व पिट्स्बर्गमधील मराठी मंडळींच्या संख्येत बरीच वाढ होईपर्यंत तो रिवाज चालू राहिला. श्रीमती शुभा जोशी, त्यांच्या कन्या जुई जोशी व सौ. सायली मूर्ति, जावई  श्री. राजीव मूर्ति आणि नातू विशाल व किशोर मूर्ति या सर्वांच्या दुःखात मंडळ सहभागी आहे.

### मंडळाने दिलेल्या देणग्या —

दरवर्षीप्रमाणे मंडळाने 'एकल विद्यालय फाउंडेशन ऑफ् यू.एस.ए.' या संस्थेस २००७ साली मंडळाने ७३० डॉ. ची देणगी दिली. ही संस्था भारतातील लहान लहान गांवांमधे केवळ एका खोलीत बसणाऱ्या प्राथमिक शाळा चालवते. आपल्या मंडळाने दिलेल्या देणगीचा उपयोग यवतमाळ जिल्ह्यातील दोन शाळांसाठी केला जातो. तेथील विद्यार्थ्यांची हस्तलिखित पत्रे मंडळाकडे आली आहेत.

तसेच हिंदु—जैन मंदिराच्या वास्तूकामासाठी मंडळातर्फे १००१ डॉ.ची देणगी देण्यात आली.

## सर्व सभासदांस जाहीर आवाहन

दिवाळीच्या कार्यक्रमप्रसंगी सभासदत्वाचे शुल्क गोळा करण्याचे काम श्री. व सौ. धर्माधिकारी, सौ. स्वाती मुजुमदार, सौ. स्वरूप नेमळेकर आणि श्री. हेगडे यांनी केले. २००८ सालासाठी आतापर्यंत 'नीलपत्र'धारी सभासदांची (Blue Card Members) संख्या ४६ एवढी झाली आहे. या अनुषंगाने मंडळ पुन्हा एकदा खालील गोष्टी सर्वांच्या निदर्शनास आणू इच्छिते —

- मंडळ दरवर्षी ७३० डॉ. भारतातील एकल विद्यालयांना देणगी म्हणून पाठवते.
- गणेशपूजेच्या प्रसंगी हिंदु—जैन मंदिरात उपस्थित असलेल्या सर्व मंडळींस मंडळ महाप्रसाद म्हणून भोजन देते व त्यासाठी शुल्क आकारले जात नाही.
- नवीन कायद्यांनुसार गेल्या वर्षापासून मंडळास एक खास विमा उतरविणे (Liability Insurance) आवश्यक झाले आहे.

या सर्व गोष्टींचा खर्च नीलपत्रधारी सभासदांनी भरलेल्या रकमेतून निभावून न्यावा लागतो. म्हणून सर्वांना नम्र विनंति आहे, की  जास्तीत जास्त मंडळींनी नीलपत्रधारी सभासद व्हावे. तसे घडून आल्यास गणेशपूजेच्या प्रसंगी अतिरिक्त (additional) देणगी जमा करण्याची आवश्यकता कमी होईल. तसेच भारतातून एकदोन उत्तम कलाकार आले, तर त्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी लागणारे आर्थिक बळ मंडळास लाभेल.

==================================================================

मंडळाची सर्व वार्तापत्रे आणि निवेदने ई—पत्राद्वारे पाठवली जातात. तसेच मंडळाच्या सर्व आगामी कार्यक्रमांविषयींची निवेदने व मंडळाबद्दलची इतर माहिती मंडळाच्या वेबसाइटवर (mmpgh.org) उपलब्ध असते, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच आपल्या परिसरात किंवा आपल्या कामाचे ठिकाणी कोणी नवीन कुटुंब किंवा व्यक्ति आल्यास त्यांनाही मंडळाबद्दल माहिती करून द्यावी व त्यांना मंडळाची वेबसाइट पाहण्यास सांगावे.

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २२ – अंक क्र. १


दि. २६ जानेवारीच्या संक्रांतीच्या कार्यक्रमासाठी मरीसविल् कम्यूनिटी सेंटरला पोहोचण्याच्या सूचना –

**Directions to Murrysville Community Center (Sankranti Program, January 26, 2008)**
http://www.murrysville.com/documents/comm_ctr_dir.pdf

**From the East:**

- Enter Murrysville on Route 22-heading west
- Counting the light at the Sheetz gas station (on the left) as the first, continue through two more to the 4th light at Gates Avenue.
- Enter the left turning lane and make the left onto Gates
- The first left (street) off Gates is Carson Ave. Turn left
- Pass the fence around the ball field (on left) and look for the paved driveway past the fence.
- Turn left into the driveway.
- Community Center is the single story building that has a Senior Citizen's Center sign over the front door area.

**From the West:**

- Enter Murrysville on Route 22-heading east
- Stay on Rt. 22 through the lights at 1st intersection (Wendy's on the right) and the 2nd intersection (McDonald's on the left).
- Immediately after 2nd intersection, look for a right turn off Rt. 22 onto
- Reed Blvd. (almost like an exit from a highway)
- Turn onto Reed Blvd. (right) and look for Carson Avenue the 2nd right hand street,
- Make a right onto Carson Avenue
- Pass the fence around the ball field (on left) and look for the paved
- driveway past the fence
- Turn left into the driveway.
- Community Center is the single story building that has a Senior Citizen's Center sign over the front door area.


२००८ सालासाठी सभासद झालेल्यांची यादी पान ६वर पहावी –

Please see Page 6 for the List of Paid Up Members for 2008 –

## List of Paid-Up Mandal Members for Year 2008

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Apte, Udayan | 25 | Lele Milind & Anagha |
| 2 | Belambe Ajay & Vinita | 26 | Manohar Priyadashan & Anagha |
| 3 | Bhide Shantanu & Veena | 27 | Medhekar Niraj & Anjali |
| 4 | Chaudhari Neela & Narayan | 28 | Mujumdar Ratnakar & Swati |
| 5 | Chauk Srinivas & Archana | 29 | Mulherkar Harshal & Amita |
| 6 | Deoras Bhanu | 30 | Nemlekar Pramod & Swarup |
| 7 | Deoras Sunil & Kiran | 31 | Palekar Sharad & Alka |
| 8 | Deshmukh Uday & Meenal | 32 | Pandit Santosh & Sunita |
| 9 | Dharmadhikari Vishnu & Vasudha | 33 | Patil Balaji & Vaishali |
| 10 | Dixit Niranjan & Sudha | 34 | Patil Rajesh & Sonali |
| 11 | Fulay Pradeep & Jyotsna | 35 | Patkar Shailesh & Seema |
| 12 | Ginde Kaustubh & Mayura | 36 | Pearce Usha |
| 13 | Godse Ravi & Madhuri | 37 | Potdar Rajesh & Preeti |
| 14 | Hattangady Nitin & Anita | 38 | Sabnis Sandeep & Sayle |
| 15 | Hegde Subhash & Vaishali | 39 | Saboo Santosh & Shilpa |
| 16 | Jatkar Arun & Shobha | 40 | Sahasrabudhe, Ruta |
| 17 | Joshi Kishor & Usha | 41 | Salunkhe Bipin & Ashwini |
| 18 | Joshi Sagar | 42 | Sample Vivek & Purnima |
| 19 | Joshi Sharad & Asha | 43 | Sane Mahesh & Manali |
| 20 | Kar Dilip & Nima | 44 | Shete Prakash & Leena |
| 21 | Karwande Vivek & Prajakta | 45 | Shinde Dilip & Shakuntala |
| 22 | Kotwal Deepak & Nirmal | 46 | Telang Rahul & Ashwini |
| 23 | Kulkarni Prathyumna & Geeta | 47 | Teredesai Pradeep & Chitra |
| 24 | Lambore Sanjay & Suchita | 48 | Thakar Girish & Leena |

या सर्वांचे मनःपूर्वक आभार!